# Greenlawns School - Worli

Terminal Examination - 2017 - 2018

कक्षा :- आठवी | पूर्णांक :- 80

विषय :- मराठी

दिनांक :- 21.09.2017 | समय :- 2 घण्टे

---

विभाग - अ

भाषा - विभाग (Marks - 40)

प्रश्न 1) खालीलपैकी एका विषयावर 15 – 20 ओळींचा निबंध लिहा :- (08)

i. माझे आवडते शिक्षक

ii. वेळेचे महत्त्व

iii. मला लॉटरी लागली तर .....

प्रश्न 2) खालील दिलेल्या विषयावर पत्र लिहा :- (5)

तुमच्या मैत्रिणीला आंतरशालेय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहा.

प्रश्न 3) खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :- (10)

नेता हा जनतेचे नेतृत्व करणारा पुढारी आहे. समाजाची वाटचाल प्रगतीकडे करण्यासाठी त्याचे कार्य महत्त्वाचे आहे.

१५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले पण भारताची घटना मात्र १९५० मध्ये तयार झाली व या घटनेचे शिल्पकार होते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर)·

त्या काळात आपल्या समाजावर चातुर्वण्याचा प्रभाव फार होता. अशा वेळी दलित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या बाबासाहेबांनी बुद्ध धर्म स्वीकारून आपल्या समाजाला जागृत केले.

त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला. त्यांचे वडील लष्करात सुभेदार मेजर होते. ते सहा वर्षांचे असतांना मातृप्रेमाला पारखे झाले. पदवी घेतल्यानंतर

बडोदे संस्थानची शिष्यवृत्ती त्यांना मिळाली. १९३३ मध्ये उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले होते. कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयाची पदवी त्यांनी घेतली होती. (पी.एच्.डी.)

आपल्या समाजबांधवांना जागृत करतांना त्यांना शिक्षणाचे व स्वावलंबनाचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. आपल्या मागासलेल्या समाजाचा उद्धार करण्यासाठी त्यांनी अविश्रांत मेहनत केली. ज्ञानार्जनाची आस त्यांच्यात उत्पन्न केली.

त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत कणखर व बाणेदार होते. स्वत: शिक्षणासाठी त्यांनी खूप कष्ट केले होते म्हणून ते स्वावलंबनाचे महत्त्व जाणत होते. चाळीच्या जीवनात शांतता लाभत नाही म्हणून त्यांची अभ्यासाची वेळ रात्री २ ते पहाटे ५ वाजेपर्यंत असे.

प्रामाणिकपणा , सत्यावर विश्वास , मातृभूमीवरील प्रेम इ. गुणांमुळे माझ्या जीवनात त्यांचे स्थान अजरामर आहे. 'वाचाल तर वाचाल' हा त्यांचा महामंत्र होता. अस्पृश्यतेचा डाग पुसण्यासाठी महाड येथील चवदार तळ्यावर सत्याग्रह केला.

सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालयांची स्थापना त्यांनी केली.

प्रश्न :-

i. नेता म्हणजे कोण ? त्याचे कार्य कसे आहे व का ? (2)

ii. डॉ. आंबेडकर यांचा जन्म कधी झाला ? त्यांच्या शिक्षणाबद्दल माहिती द्या ? (2)

iii. त्यांनी समाजबांधवांना जागृत करण्यासाठी काय केले ? (2)

iv. त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे होते ? त्यांनी कशासाठी व कोठे सत्याग्रह केला ? (2)

v. वाक्य बनवा :- भारतीय , स्वातंत्र्य (2)

## व्याकरण - विभाग

प्रश्न 4) अ) समानार्थी शब्द लिहा :- (2)

1. साहित्य
2. अपघात
3. तक्रार
4. गवत

आ) विरुद्धार्थी शब्द लिहा :- (2)

1. प्रचंड
2. अवघड
3. बळकट
4. ताजे

इ) वचन बदला :- (2)

1. नाते
2. स्वाक्षरी
3. कारखाना
4. साखळ्या

ई) लिंग बदला :- (2)

1. बाहुली
2. डॉक्टर
3. विक्रेता
4. विद्यार्थी

उ) अशुद्ध शब्द शुद्ध करा :- (2)

1. विदाता
2. माणूसकि
3. नीर्झर
4. भिर भीरती

ऊ) वाक्प्रचारांचे अर्थ लिहा :- (2)

1. हात पसरणे -
2. मध्यस्थी करणे -
3. काकुळतीला येणे -
4. रक्तात भिनणे -

क) खालील दिलेल्या वाक्यात योग्य विरामचिह्ने लावून वाक्य पुन्हा लिहा :- (2)

1. दीपक आलोकचं अगदी बरोबर आहे रोशन म्हणाला
2. अरे तू फावल्या वेळात करतोस काय गुरुजींनी सुचवून पाहिले

ख) खालील दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :- (2)

1. आमच्या <u>शाळेसमोर</u> <u>एक</u> फुलबाग आहे.
2. मुलांनी <u>चिन्नमाला</u> मदत केली <u>कारण</u> तिची मुलगी भाजली होती.

ग) काळ ओळखा :- (1)

1. मी उद्या समक्ष येईन.
2. मुले अभ्यासात हुशार आहेत.

## विभाग - ब

## साहित्य - विभाग (40 Marks)

प्रश्न 5) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (12)

i. लेखकाला वाचनाची गोडी कशी लागली ?

ii. अंबालाल साराभाई यांची माहिती लिहा व त्यांचे डोळे केव्हा पाणावले ? ते ही लिहा.

iii. चिन्नम्मा का रडत होती ?

iv. आलोकने आणि त्याच्या मित्रांनी चिन्नम्माला कशी मदत केली ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (4)

i. मुले संध्याकाळी कुठे जमली ?

ii. विक्रमला चित्राचित्रांची पुस्तके कोणी दिली होती ?

iii. विमानाला उशीर झाल्यास लेखक काय करायचे ?

iv. फटाक्यांमुळे काय होते ?

इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (4)

i. आलोकसारख्या ................. मुलाचे ................. घेणे चिन्नम्माला पटत नव्हते.

ii. लेखनाचा ............... हेतू .............. असतो.

iii. ................ ही गुजरातची राजधानी , .................. नगरी.

iv. वाचनाची मला गोडी लागली ती लहानपणी ................ सांगितलेल्या ................ .

ई) कोण , कोणास ते म्हणाले :- (3)

i. " तुला ती नकोत. "

ii. " वाचली , पण तिला खूप भाजलं आहे. "

iii. " स्वत:च्या जिवाची पर्वा न करता ती मला वाचवायला धावली होती. "

उ) शब्दार्थ लिहा :- (3)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | संपदा | 2. | दुणावणे |
| 3. | खवणे | 4. | संकोचणे |
| 5. | अवचित | 6. | सांगता |

## पद्य - विभाग

प्रश्न 6) अ) थोडक्यात उत्तरे लिहा :-

1. पाऊस पडल्यानंतर निसर्गात कोणकोणते बदल होतात , असे कवी म्हणतो ? (3)
2. कष्टकऱ्यांची वस्ती कोठे आहे ? (1)
3. पाने - फुले कशात नाहतात ? (1)
4. नाचरा नाद कोठे भरला आहे ? (1)

आ) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा व कवितेच्या कवीचे नाव लिहा :- (4)

इमान .......................................

.................................................

.................................................

.................................................

.................................................

.................................................

.................................................

................................. भाग्यविधाते ·

इ) जोड्या लावा :- (2)

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| 1. | झुळझुळणारे | झरे |
| 2. | खळखळणारे | पाखरे |
| 3. | लवलवणारे | गवत |
| 4. | भिरभिरती | तुरे |

ई) कवितेत आलेले जोडशब्द पूर्ण करा :- (2)

1. .................. तिकडे  2. .................. वारा

3. .................. रानी  4. .................. कपारी

---------------- स मा प्त ----------------